झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण

(परिपत्रक क्र. 175) दि. 09/09/2016

क्र: SRA/ENG/Desk/17893/Gen
दि: 09 SEP 2016

विषय : सार्वजनिक मालकीच्या जमिनीवरील झोपडयांचा पुनर्विकास करताना खाजगी विकासकांकडून अधिमूल्य (प्रिमियम) आकारणी करण्याबाबत.

संदर्भ : १) शासन आदेश, नगर विकास विभाग क्र. टिपीबी-४३०८/८९७/प्र.क्र. १४५/०८/नवि-११, दि. १६.०४.२००८.
२) शासन निर्णय, गृहनिर्माण विभाग समक्रमांक, दिनांक २६.०५.२००९
३)झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचे क्र.एसआरए/इनजी/३३४६, दि. १२.०६.२००८ चे परिपत्रक क्र. ८५.
४)शासननिर्णय, गृहनिर्माण विभाग क्र. झोपुयो २००८/प्र.क्र.२३६/झोपसू -१ दि. ०२.०७.२०१०.
५) )झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचे परिपत्रक क्र. ११४ क्र. झोपुप्रा/विनि/कार्या-१/टे/एफ-१/३०४३ दि.१९.०७.२०१०.
६)झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचे परिपत्रक क्र. ११४ अ क्र. झोपुप्रा/मुकाअ/परिपत्रक/१७४/२०१६ दि. ०६.०६.१६.

उपरोक्त संदर्भ क्र. १ अन्वये, राज्य शासनाकडून सार्वजनिक मालकीच्या जमिनीवरील झोपडपट्टयांचा पुनर्विकास खाजगी विकासकांकडून करताना अधिमूल्य आकारणी व वसूलीबाबत आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. सदर अधिमूल्य रेडी रेकनर दराच्या २५% दराने वसूल करण्याचे निर्देश आहेत.

तसेच, उपरोक्त अधिमूल्याची रक्कम विविध टप्प्यांमध्ये वसूल करण्याचे शासन निर्णय संदर्भाधीन क्र. ४ अन्वये निश्चित केले आहे. तथापि, मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपुप्रा यांनी संदर्भाधीन परिपत्रक क्र. ६ अन्वये वर उल्लेखित अधिमूल्य चालू रेडी रेकनर दरानुसार असलेल्या शीर्घ्रगणनेनुसार वसूल करण्याचे निर्देश केले होते, मात्र उपरोक्त परिपत्रक शासन निर्णयानुसार नसल्यामुळे ते रद्द करुन पूर्वीचे परिपत्रक क्र. ११४ अन्वये वसूल करण्यात यावेत अशी विनंती PEATA यांनी केलेली आहे.

सदर बाब तपासताना विधी सल्लागार (झोपुप्रा) यांनी परिपत्रक शासन अधीन नसल्यास शासन निर्णय या नुसार कार्यवाही होणे आवश्यक आहे असे अभिप्राय दिलेले आहे त्यामुळे परिपत्रक ११४ अ ग्राहय न धरता मूळ परिपत्रक क्र. ११४ क्र. झोपुप्रा/विनि/कार्या-१/टे/एफ-१/३०४३ दि.१९.०७.२०१० अन्वये कार्यवाही करण्यात यावी असे आदेश आहेत.

सदर आदेशाची तात्काळ अमंलबजावणी करावी.

(स्वाक्षरी) 9/9/2016

मुख्य कार्यकारी अधिकारी
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण

प्रत : सर्व विभाग प्रमुख / झोपुप्रा